# विविधा

# नवीन नाशकात फलकबाजीमुळे विद्रुपीकरण

**निशिकांत पाटील**

**नवीन** नाशिकमध्ये गेल्या काही महिन्यांपासून बऱ्याच ठिकाणी परवानगी नसतांना देखील फलकबाजी केली जात असल्याने परिसराचे मोठ्या प्रमाणावर विद्रुपीकरण होत आहे. यावर मात्र महापालिका प्रशासन मूग गिळून बसल्याचे चित्र बघायला मिळत आहे.

सध्याच्या राजकारणात काय बदल होतील, हे काही सांगता येणार नाही. एखाद्या नेत्याला कुठले पद मिळाले तर त्यावर फलकांच्या माध्यमातून स्वस्तात शुभेच्छांचा वर्षाव होतांना दिसतो तर काही ठिकाणी भाई, दादांना देखील वाढदिवसाच्या किंवा अन्य शुभेच्छा दिल्या जातात. हे होत असतांना बऱ्याच ठिकाणी महापालिकेने ठरवून दिलेल्या जागा सोडून अन्य ठिकाणी देखील सदरहू फलक बघायला मिळते. याप्रकरणावर महापालिकेतर्फे शहर विद्रुपीकरण कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल होणे अपेक्षित असतांना तसे मात्र होत नाही. गेल्या काही दिवसांपूर्वी अंबड पोलिसांनी स्वतःहून पुढाकार घेत काही कुख्यात गुंडांनी फलकबाजी केल्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल केला होता. त्याबद्दल नागरिकांनी पोलिसांचे कौतुक केले होते.

तत्कालीन पोलीस आयुक्त दीपक पांडे यांनी त्यांच्या कार्यकाळात अनधिकृतरित्या लावण्यात आलेल्या फलकांवर कारवाईचा बडगा उचलला होता. त्यामुळे काही काळ का होईना नवीन नाशिकसह शहराची फलकांच्या जाचातून सुटका झाली होती. मात्र त्यांची बदली होताच, हे चित्र बदलल्याचे बघावयास मिळत आहे.

**न्यायालयाच्या आदेशाला केराची टोपली**

नाशिकमध्ये अनधिकृत फलकांबाबत एकाने न्यायालयात याचिका दाखल केली असता न्यायालयाने अशा अनधिकृत फलकांवर शहर विद्रुपीकरण कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्याचे आदेशित केले होते. मात्र सध्या किरकोळ कारवाई वगळता अनधिकृत फलकांवर कारवाईच होत नसल्याचे दिसून येत आहे.

**गुन्हा दाखल करण्याचे काम नेमके कुणाचे?**

शहरात कुठेही फलक लावायचे असल्यास महापालिकेत ठराविक रकमेचा भरणा करून महापालिकेने ठरवून दिलेल्या ठिकाणीच व नेमून दिलेल्या आकारात फलक लावण्याचा नियम आहे. अनधिकृत फलक आढळून आल्यास महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी पोलीस ठाण्यात जाऊन संबंधितांवर गुन्हा दाखल केला पाहिजे. मात्र महापालिकेच्या अधिकाऱ्यांमध्ये याबाबत उदासीनता दिसून येत आहे.



अशा धोकादायक फलकांमुळेही अपघात होण्याची भीती नाकारता येत नाही.

# सिंहस्थआधी कामे होतील का?

**रवींद्र केडीया**



**सिंहस्थ** कुंभमेळा ही नाशिक शहरासाठी दर बारा वर्षांनी येणारी मोठी विकासाची संधी आहे. हजारो कोटींच्या खर्चातून शहराचा स्थायी विकास साधता येऊ शकतो. मात्र, राज्य शासनाच्या गोंधळलेल्या धोरणामुळे सिंहस्थाच्या कामांना अद्याप गती मिळालेली नाही. त्यामुळे कुंभमेळ्याच्या आधी सर्व विकासकामे पूर्ण होतील का, असा सवाल नागरिकांतून उपस्थित केला जात आहे.

**नियोजनात सातत्य, अंमलबजावणीत गोंधळ**

जिल्हा प्रशासन सातत्याने विकास आराखडे तयार करत आहे. मात्र, त्यात वेळोवेळी सुधारणा व बदल होत असल्याने निश्चित दिशा अद्याप ठरलेली नाही. आरंभिक अंदाज अठरा हजार कोटी रुपयांचा होता, तो पंधरा हजार कोटींवर आणि नंतर अकरा हजार कोटींवर आणण्यात आला आहे. प्रत्येक कामाच्या उपयुक्ततेचा आढावा घेतला जात आहे, असे सांगितले जात असले, तरी ठोस निर्णयाअभावी केवळ बैठका सुरू असल्याची टीका होत आहे.

**प्राधिकरणाचे अस्तित्व अधांतरीत**

सिंहस्थासाठी स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करण्याचा निर्णय जाहीर झाला असला तरी प्रत्यक्षात ते अस्तित्वात आलेले नाही. त्यामुळे विकासकामांना अधिकृत गती मिळत नाही. प्राधिकरण कधी स्थापन होईल, याबाबतही अनिश्चितता कायम आहे.

**स्मार्ट सिटीचे अपयश**

स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या माध्यमातून नाशिकच्या विकासाचा प्रयत्न सुरू आहे. मात्र, नागरिकांच्या मते हे काम अर्धवट व अपूर्ण आहे. पाच वर्षे उलटूनही बहुतांश प्रकल्प पूर्ण झालेले नाहीत, तसेच मनपा प्रशासनाला हस्तांतरितही झालेले नाहीत. परिणामी, येत्या कुंभमेळ्यापूर्वी स्मार्ट सिटीच्या माध्यमातून कामे पूर्ण होतील का, यावरही प्रश्नचिन्ह आहे.

**रस्ता कामांचा शुभारंभ केव्हा?**

राज्य शासनाने रिंगरोड व त्र्यंबकेश्वर-नाशिक रस्त्याच्या काँक्रिटीकरणासाठी २२७० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मात्र, अद्याप प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही. सार्वजनिक बांधकाम विभागात ठेकेदारांचे देयक प्रलंबित असल्याने कामांच्या सुरुवातीला विलंब होत आहे. निविदा प्रक्रिया अद्यापही स्पष्ट नाही, त्यामुळे प्रत्यक्ष कामे पावसाळ्यानंतरच सुरू होतील, असे संकेत मिळत आहेत.

**मोठे आव्हान; अल्पवेळात मोठी कामे**

२०२७-२९ या काळात सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे. परंतु २०२४ मध्ये कामांना सुरुवात झाली, तरी उर्वरित १८ महिन्यांत सर्व कामे पूर्ण करणे प्रशासनासाठी मोठे आव्हान ठरेल. त्यात नदीपात्र शुद्धीकरण, पूल व घाट बांधणी, मलजल प्रक्रिया प्रकल्प, रस्ते आणि पार्किंग व्यवस्था, सीसीटीव्ही उभारणी, कचरा डेपो उभारणी यांसारखी मोठी कामे प्राधान्याने करावी लागणार आहेत. जर तत्काळ कामांना सुरुवात झाली नाही, तर पुन्हा एकदा कुंभमेळ्याच्या तोंडावर घाईघाईने कामे उरकण्याची वेळ येणार आहे.

# लोभ सोडून पाहा

**भारत पगारे**

**दुसऱ्याकडे** जे आहे ते आपल्याकडेही पाहिजे, ते तसे जगतात, मग आपणही तसेच जगले पाहिजे, ही वृत्ती, विचार हे कोडं अद्याप घर करून आहे. पूर्वी संतोषी मनाने जगणारा माणूस आता कालानुरुप लोभी बनला आहे. नाशिकमध्ये त्याची अनेक उदाहरणे आहेत. यात विशेष म्हणजे, शिक्षितांचा भरणा जास्त आहे. पैशांच्या आमदनी तसेच लोभासाठी आजच्या काळात शिक्षिताला कुणी काही सांगेल तो ते करायला तयार आहे. मात्र, सर्वसामान्य कष्ट करुन उदरनिर्वाह करत आहेत. आहे त्यात समाधान मानायला कुणी तयार नाही, त्यामुळे ज्यांनी जे कमवले आहे ते सुद्धा त्यांना बिनभावात गमवावे लागत आहे.

नाशिक शहर व जिल्ह्यात



सायबर चोरटे सक्रिय आहेत. सर्वत्र आधुनिकतेचा व टेक्नॉलॉजीचा बोलबाला असताना त्याचे चांगले व वाईट दुष्परिणामही दिसत आहेत. अत्याधुनिकीकरणाच्या युगात सध्याची पिढी 'व्हास्ट' झाली आहे. ही पिढी चांगली अन् वाईट कामगिरी करायला अग्रेसर आहे. त्यातीलच काही संशयित थेट इतरांच्या बँक अकाऊंटमधून व ओटीपी मिळवत उच्चशिक्षित, डॉक्टर, पोलीस अधिकारी, बँक अधिकारी, मॅनेजर व इतर सामान्य व श्रीमंतांचे बँकखाते 'झिरोबॅलन्स' करत आहेत. थोडक्यात एखाद्याला फसविणे, ठगविणे वा लुटण्याची ही अत्याधुनिक टेक्निक सर्वदूर पसरत चालली आहे. शहरात गेल्या काही दिवसांत ३५ जणांना सायबर चोरट्यांनी लक्ष केले. समोरासमोर भेट नाही, ओळख नाही तरीही या सायबर भामट्यांनी या शिक्षितांना पार्टटाईम जॉब, गुंतवणुकीवर जादा परतावा तसेच वर्क फ्रॉम होम व शेअर ट्रेडिंगच्या माध्यमाचे गाजर दाखवून व होम अरेस्टचा धाक दाखवून लुबाडले. त्यातच कोट्यवधी ते लाखो रुपयांना ठगविले. ठगविणारे अन् ठगीचा धनी बनलेले शिक्षित आहेतच. मात्र, टेक्नोसॅव्हीची विविध पदरे आत्मसात करुन काही चोरटे श्रीमंताला गरीब करत आहेत. सामान्य असो वा गर्भश्रीमंत, त्याला आपल्या आजूबाजूला, शहरात, जिल्ह्यात व देशाच्या कानाकोपऱ्यात काय चालले आहे, हे माहिती असते. किंबहूना तो मोबाईल, इंटरनेट, बातम्या आणि नातलगांच्या संपर्कातून राहून घडामोडी जाणून घेत असतो. त्यात अमक्याला लाखोंचा गंडा, तमक्याकडून इतके पैसे उकळले, पैशांचे आमिष दाखविले वैगेरे हे त्याला माहिती असते. इतके सगळे काही आपल्या डोळ्यांदेखत घडत असताना, परिणामाची माहिती असताना तरीही, सुजाण नागरिक सायबर संशयितांच्या जाळ्यात अडकत आहेत. शिक्षित असल्याचा समाजमनांत कुणासही फायदा होतो, हे सर्वश्रुत आहे. असे असले तरी उत्तरप्रदेश, बिहार वा नोएडा किंवा झारखंड आणि थेट परदेशात बसलेला हॅकर वा संशयित महाराष्ट्रातील वा नाशकातील एखाद्या नागरिकाला थेट कॉल करुन जादा पैसे, लॉटरी, क्रेडीट कार्डचे लिमिट वाढवून देतो, पार्ट टाईम आणि वर्क फ्रॉम होमचे आमिष दाखवून काही मिनिटांत उल्लू बनवतो. थोडक्यात हा दुधखुळे असल्याचाच प्रकार आहे. तुम्हाला चार कोटी रुपयांची लॉटरी लागली आहे, असे म्हणत काही दिवसांपूर्वी एका वृद्धेकडून टॅक्स व रजिस्ट्रेशनच्या नावाखाली चार लाख रुपये उकळण्यात आले.

शहरात विविध प्रकारे फसवणूक झाल्याचे शेकडो गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे हा आकडा पाहता अद्यापही नागरिक पाहिजे तितके सजग व जागरुक नसल्याचे दिसून येते. सध्या लहानांपासून मोठ्यांकडे मोबाईलसह इंटरनेट आहे. यूपीआय व डिजिटल आर्थिक व्यवहारांसाठी नागरिकांचे बँक खाते, मोबाईल नंबर आधार कार्डला लिंक्ड आहे. याच महत्त्वपूर्ण माहितीद्वारे सायबर संशयित एखाद्याला जाळ्यात ओढतात. एखादा मोबाईलधारक व्हॉट्सअॅप किंवा टेलिग्राम सर्फिंग करत असताना त्याला उत्तेजित करणारे फोटो वा जीआयएफ फाईल पाठवून जाळ्यात ओढतात. पहिले नमस्कार करुन हे संशयित आपली सर्वच माहिती जाणून घेतात. त्यानंतर मी मुलगी आहे, माझे पती वारले आहेत, परंतु वडिलांनी माझ्या नावावर कोट्यवधी रुपयांची प्रॉपर्टी ठेवली आहे, तुम्ही माझ्यासोबत लग्न करा. तुमचे आधारकार्ड, बँक डिटेल्स मला पाठवा, त्यानंतर निम्मी प्रॉपर्टी तुमच्या नावावर करते, असे ही संशयित महिला बोलते. वास्तविक समोरुन मेसेज वा अश्लील फोटो पाठवणारे काही महिला व पुरुष असतात. त्याने दाखविलेले फोटो व साधलेला संवाद यातून संशयित जवळीक साधून समोरील व्यक्तीला थेट त्याने सांगितलेल्या बँक खात्यावर पैसे पाठवण्यास भाग पाडतो किंवा काही प्रकरणात वेगवेगळी कारणे सांगून विविध धोकादायक अॅप्लिकेशन डाऊनलोड करण्यास सांगतो. याच अॅपद्वारे तो आधुनिक टेक्नॉलॉजीचा वापर करत संबंधिताच्या बँक खात्यातून लाखो रुपये उडवितो. त्यामुळे मोबाईल वा इंटरनेटचा वापर काळजीपूर्वक करणे गरजेचे आहे. आपल्याला आलेली अनोळखी लिंक ओपन न करता किंवा आलेला अनोळखी व्यक्तीचा मेसेज पूर्ण वाचून मगच पुढील पावले उचलणे गरजेचे आहे. विशेषत: टेलिग्राम, एनी डेस्क वा टिमव्हूवर यांसारखे अॅप डाऊनलोड करु नयेत. काही उमजत नसेल तर कोणताही प्रतिसाद मेसेज वा लिंकला देऊ नये. थोडक्यात अनोळखी मेसेज, लिंकला कोणताही प्रतिसाद(रिप्लाय) दिलाच नाही तर आपले बँक खाते आहे तसेच राहील, अन्यथा ओटीपी शेअर न करताही बँकखाते रिकामे होऊ शकते. सायबर फसवणुकींच्या अशा घटना रोजच घडत असल्याने टेक्नोसॅव्ही होणे गरजेचे आहे अर्थात ही काळाजी गरज आहे. विशेष म्हणजे संतोषी राहणे महत्त्वाचे असून लोभी बनताच त्याचा फटका सहन करावा लागतो, हे देखील नाकारुन चालणार नाही.

# मुलांना मोबाईल देताना सायबर संस्कार रुजवा

**तन्मय दीक्षित**
**सायबरतज्ञ**

**उन्हाळयाच्या** सुट्या म्हणजे मुलांसाठी आनंदाची पर्वणी, पण याच सुट्यांमध्ये मोबाईल, गेमिंग, सोशल मीडिया यांच्या अतिसंलग्नतेमुळे आज अनेक पालक चिंतेत आहेत. मात्र पालकांनी योग्य नियोजन करुन थोडी जास्त काळजी घेतली तर मुलांच्या भविष्यासाठी व पालकांच्या दृष्टीने ते महत्वाचे ठरू शकेल.

मुलांना मोबाईल देणे चुकीचे नाही, पण कधी, किती आणि कशासाठी वापरतो, हे महत्वाचे आहे. त्यांची सायकोलॉजी, त्यांची ऊर्जा आणि त्यांचे भविष्य यावर परिणाम होणारा हा विषय आहे. योग्य मार्गदर्शन आणि सायबर सेन्सिटिव्ह पेरेंटिंग केल्यास, हे डिव्हाइसेस मुलांच्या आयुष्यात एक साधन बनतात, व्यसन नव्हे. सध्याच्या डिजिटल युगात मोबाईल हा मुलांच्या हातात खेळण्यासारखा वाटतो, पण यामागचे वास्तव अधिक गंभीर आहे. मुलांना मोबाईल किती वेळ द्यावा, हे ठरवताना वय, वापराचा उद्देश आणि त्या वापराचे परिणाम या गोष्टी विचारात घेणे गरजेचे आहे. जागतिक आरोग्य संघटना आणि अमेरिकन अॅकॅडमी ऑफ पेडियाट्रिक्स यांच्या शिफारशीनुसार, ५ वर्षांखालील मुलांना स्क्रीनटाइम १ तासाच्या आत मर्यादित असावा, तर ६ वर्षांवरील मुलांसाठी योग्य तो ओळखींचे फक्त दोन तास वय वर्षे १६ पर्यंत असावेत, डिजिटल उपकरणांचा वापर हे केवळ तंत्रज्ञान नाही, तर मूल्य, जबाबदारी, आणि आत्मनियंत्रण यांचे प्रतीक आहे. पालकांनी मुलांना मोबाईल हातात देणे म्हणजे केवळ सोयीसाठी नव्हे, तर एक सायबर संस्कार देण्याची संधी आहे. मोबाईलचा अतीव वापर केवळ शारीरिक परिणामच देत नाही, तर मानसिक, भावनिक आणि सामाजिक आरोग्यावरही गंभीर परिणाम करतो. सातत्याने मोबाईल वापरल्यास डोळ्यांवर ताण, झोपेच्या सवयी बिघडणे, वागणुकीत चिडचिड, संवादक्षमता कमी होणे असे परिणाम दिसून येतात. याव्यतिरिक्त, सायबर गेमिंग किंवा सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर मुले नकळतपणे ऑनलाइन फ्रॉड, सायबर बुलिंग, अश्लील कंटेंट, गुप्त माहिती शेअरिंग यासारख्या धोरणांच्या विळख्यात अडकू शकतात. हे टाळण्यासाठी पालकांनी त्यांच्यात सायबर संस्कार रुजवणे अनिवार्य आहे. परंतु याच मोबाईलचा वापर जर योग्य दिशेने झाला, तर गेमिंगमधूनही करिअरच्या संधी खुल्या होऊ शकतात. गेम डेव्हलपमेंट, गेम टेस्टींग, स्ट्रिमिंग, अॅनिमेशन यांसारख्या क्षेत्रांत आज जागतिक पातळीवर लाखो रुपयांची कमाई करणारे तरुण आहेत. मात्र यासाठी आवश्यक असतो मार्गदर्शित सराव, डिजिटल शिस्त आणि तंत्रज्ञानामागचे ज्ञान.



**पालकांसाठी सल्ला**

* मुलांचा मोबाईल वापर ठराविक वेळेसाठीच असावा आणि त्यात शिक्षणपर किंवा कौशल्यवर्धक अॅप्सचाही समावेश असावा.

* तंत्रज्ञानाचा वापर करून मोबाईलच्या मर्यादा ठेवा.

* मुलांशी खुला संवाद साधा ते कोणत्या अॅप्सचा वापर करतात, कोणाशी बोलतात हे समजून घ्या.

* मैदानी खेळ आणि कौशल्यविकास या गोष्टींना प्राधान्य द्या.

* दररोज १-२ तास शारीरिक खेळ आवश्यक आहे.

* सध्याच्या डिजिटल युगात मुलांना तंत्रज्ञानापासून दूर नेणे शक्य नाही, पण त्यांना योग्य सायबर संस्कार देऊन, आपण त्यांना सजग, सुरक्षित आणि सक्षम नागरिक नक्कीच बनवू शकतो.

* मोबाईलचा वापर हे साधन आहे, ध्येय नव्हे आणि पालकत्व हे आता फक्त सामाजिक नव्हे, तर सायबर सेफ पेरेंटिंग होणे काळाची गरज आहे.

**जास्त मोबाईल वापराचे दुष्परिणाम**

डोळ्यांचे आजार डिजिटल आय स्ट्रेन, ड्राय आय सिंड्रोम, मान व पाठदुखी, चुकीच्या पोस्चरमुळे लठ्ठपणा, शारीरिक हालचाल कमी, मानसिक परिणाम देखील होतात, त्यात लवकर चिडचिड होणे, एकाग्रता कमी होणे, झोपेचे विकार, मेंदूवर ताण, इंटरनेट अॅडिक्शन सिंड्रोम. तर सामाजिक परिणामात मैत्री-नातेसंबंधांवर परिणाम, रिअल लाईफ संवाद कमी होणे, सतत ऑनलाईन राहण्याची सवय आदींचा समावेश आहे.

# कर नाही त्याला डर कशाला?

**नरेंद्र जोशी**

**जनसुरक्षा** विधेयकाबाबत सध्या उलटसुलट चर्चा सुरु आहे. विरोधक त्या विरुध्द आंदोलन करत आहेत. बेकायदेशीर कृती व बेकायदेशीर संघटनांना प्रतिबंध करण्यास सक्षम असे अनेक कायदे अस्तित्वात असताना एका नव्या कायद्याची अजिबात गरज नसल्याचे देखील त्यांचे मत आहे.तर दुसरीकडे जनसुरक्षा कायद्यावर अनेक शंका घेत कायद्याला विरोध केला जातो, अर्धवट व सोयीस्कर बोलले जाते, असे सत्ताधारी म्हणत आहे. सामान्य जनता त्यामुळे संभ्रमात आहे.

जनसुरक्षा विधेयक महाराष्ट्र सरकारने माओवादी आणि तत्सम संघटनांच्या बेकायदेशीर आणि समाजविघातक कृत्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी तयार केले आहे. या विधेयकाचे मुख्य उद्दिष्ट राज्य आणि शहरांमध्ये माओवाद्यांच्या सुरक्षित आश्रयस्थाने आणि शहरी अड्ड्यांवर नियंत्रण ठेवणे आणि त्यांचे जाळे तोडणे हे आहे. या विधेयकामुळे सरकारला अशा संघटनांना बेकायदेशीर ठरवून, त्यांच्या सदस्यांना अटक करण्याचा अधिकार मिळणार आहे.

या विधेयकामुळे माओवादी आणि तत्सम संघटनांवर नियंत्रण येईल. कारवायांवर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल. नागरिकांच्या सुरक्षेसाठी आणि मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी मदत होईल. शहरांमध्ये कायदा आणि सुव्यवस्था राखण्यास मदत करेल. बेकायदेशीर आणि समाजविघातक क्रिया रोखण्यास मदत होईल. हे फायदे असले तरी काही लोक या विधेयकामुळे लोकशाही हक्क आणि स्वातंत्र्यावर परिणाम होण्याची भीती व्यक्त करताना दिसत आहे. या कायद्याचा गैरवापर होण्याची शक्यता वाटत आहे, ज्याचा निर्दोषांनाही त्रास होऊ शकतो. हे विधेयक बेकायदेशीर कृती व बेकायदेशीर संघटना यांच्या अत्यंत व्यापक आणि अस्पष्ट व ढोबळ व्याख्या वापरुन व्यक्ती व संघटनांवर कठोर निर्बंध आणण्याचा प्रयत्न करणारे आणि प्रत्यक्षात जनतेचे ज्वलंत प्रश्न सोडविण्यासाठी संघर्ष करणाऱ्या प्रामाणिक व्यक्ती व संघटनांचा आवाज दाबण्यासाठी विधेयकाचा गैरवापर होऊ शकतो, ही भीती आहे. आजपर्यंतचा यंत्रणेचा अनुभव पाहता त्यात काही अंशी तथ्यही वाटते. म्हणूनच हा संभ्रम दूर होणे गरजेचे आहे.



जनसुरक्षा विधेयक हा कठीण कायदा आहे, ज्याचा समाजविघातक संघटनांच्या कारवायांवर नियंत्रण ठेवणे आहे. परंतु या विधेयकाचा गैरवापर होऊ शकतो. अशी भीती विविध स्तरातून व्यक्त होत आहे. सरकारच्या विरोधात आंदोलन किंवा नाराजी व्यक्त करत असताना कोणत्याही सामाजिक संघटनेला किंवा समूहाला बेकायदा ठरवून संबंधितांना अटक करण्याचे अधिकार या माध्यमातून सरकारला मिळणार आहेत. सध्या माओवादी फ्रंट संघटनेची रणनीती व कार्यपद्धती पाहता त्यांच्या विरुध्दचे गुन्हे सिद्ध होण्यास अडथळे येतात व अनेकदा आरोपी निर्दोषसुद्धा सुटतात. अशा खटल्यांमध्ये शिक्षा लागण्याचे प्रमाण कमी आहे. शहरातील माओवादी अनेक मुखवटे घालून वावरतात. त्यांच्यावर कारवाई करताना अडचण येते. आंध्रप्रदेश, तेलंगणा, छत्तीसगड आणि ओडीशा या माओवादग्रस्त राज्यांत बेकायदेशीर कृत्यांना अधिक प्रभावीपणे प्रतिबंध करण्यासाठी जनसुरक्षा कायदा लागू केलेला आहे, याद्वारे ४८ नक्षलसंबंधित संघटनांवर बंदी घालण्यात आली आहे. याच धर्तीवर महाराष्ट्रात येऊ घातलेल्या जनसुरक्षा कायद्यावर अनेक शंका घेत कायद्याचा विरोध केला जातो आहे.

या कायद्यान्वये कारवाई करताना विनाकारण कोणाही व्यक्तीला अटक किंवा संघटनेवर बंदी घालणे असे होणार नसून कायदेशीर प्रक्रिया राबविली जाणार आहे. यामध्ये एक सल्लागार मंडळ गठित केले जाणार आहे. या मंडळात उच्च न्यायालयाचे तीन न्यायाधीश असणार आहेत. एखाद्या बेकायदेशीर संघटनेवर बंदी घालताना या मंडळासमोर अहवाल सादर करावा लागेल तसेच संबंधित संघटनेलासुद्धा भूमिका मांडण्याची संधी दिली जाणार आहे. सल्लागार मंडळासमोर त्याची सुनावणी होईल. त्यानंतर सल्लागार मंडळातील न्यायाधीश साक्षीपुरावे तपासूनच योग्य निर्णय घेतील. या कायद्यान्वये व्यक्तीवर गुन्हा दाखल करताना पोलीस उपमहानिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याची परवानगी घ्यावी लागणार आहे. मुळात हा कायदा बेकायदेशीर कृत्ये करणाऱ्या व्यक्ती व संघटनांना आळा घालण्यासाठी आहे. त्यामुळे कर नाही त्याला डर कशाला? हा सत्ताधाऱ्यांचा प्रश्न आहे.